Apla Nagpur | 2022-02-05 | Page- 6
epaper.tarunbharat.net

# जनकल्याणकारी समितीच्या आरोग्ययानाचे लोकार्पण


आरोग्ययान लोकार्पण कार्यक्रमाला उपस्थित डॉ. दिलीप गुप्ता, अनुपमा काटकर व इतर

◆ **नागपूर, ४ फेब्रुवारी**

पुण्याच्या क्विक हिल फाऊंडेशनने जनकल्याणकारी समिती नागपूरला प्रदान केलेल्या आरोग्ययानाचा (रुग्णवाहिका) लोकार्पण सोहळा उमरेड तालुक्याच्या भिवगड ग्रामसंकुलातील खैरी (बुटी) या गावी नुकताच पार पडला.

क्विक हिल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी समारंभपूर्वक हे आरोग्ययान जनकल्याणकारी समितीस प्रदान केले. याप्रसंगी समितीच्या संस्कार वर्गाच्या बालिकांनी पंचारतीने ओवाळून पाहुण्यांचे स्वागत केले. प्रारंभी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन झाल्यावर स्वागतगीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी समितीचे सचिव दीपक देशपांडे यांनी समितीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. क्विक हिलतर्फे अजय शिर्के यांनी फाऊंडेशनने केलेल्या मदत कार्याबद्दल व आरोग्ययानाबाबतची भूमिका मांडली. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने आरोग्ययानाच्या सेवेबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला. खापरीच्या स्वामी विवेकानंद मेडिकल मिशनचे अध्यक्ष डॉ. दिलीप गुप्ता यांनी आरोग्ययानाच्या नियोजनाची माहिती दिली. यावेळी रा. स्व. संघाचे प्रांत सेवा प्रमुख सुनील मेहेर, अ. भा. ग्रामसंकुल सहसंयोजक मिलिंद जोशी, क्विक हिलच्या सुगंधा दाणी, जनकल्याणकारी समितीचे उपाध्यक्षद्वय रवींद्र जोशी व दिलीप चांद्रायण, कोषाध्यक्ष प्रशांत बोपर्डीकर, भूषण भोळे, जनकल्याणकारी समितीच्या किशोरी विकास प्रकल्पाच्या डॉ. सुधा दामले, मनाली पिंगळे, समितीच्या आरोग्यसेविका व संस्कारवर्ग शिक्षिका, विविध गावांचे सरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश दामले यांनी केले. दिलीप चांद्रायण यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता गोंडी नृत्य व पसायदानाने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समितीचे शिवदास कळंबे, भगवान खंडाते, प्रदीप शेंडे, पंकज दोडके, हेमंत फडनाईक, माधुरी मसराम, संजय ठाकरे, खुशाल वैद्य व अशोक नेवारे आदींनी परिश्रम घेतले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments